पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 20/01/2020 (सोमवार)

(दुपार)

## देशीदारुची साठवणुक करणाऱ्या आरोपीस अटक
## पोलीस स्टेशन बोरीची कार्यवाही

पो.स्टे. बोरी :– दिनांक 19/01/2020 रोजी पोस्टे. बोरीचे पोउपनि श्री. अमोल लगड यांना गोपनीय माहिती मिळाली की, ब्राम्हणी येथे राहणारा राजेन्द्र कोराम याने त्याच्या शेतातील घराजवळ असणाऱ्या कोंबड्याचे शेडमध्ये गव्हाचे कुटाराखाली देशीदारू साठवणुक केली आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोउपनि श्री. अमोल लगड पो. स्टे. बोरी स्टाफसह खबरेप्रमाणे त्याच्या शेतातील घरी जावुन तिथे हजर असलेल्या इसमास नाव विचारले असता त्याचे नाव राजेन्द्र गणपतराव कोराम, वय 41 वर्ष, रा. ब्राम्हणी, पा. बोरखेडी, ता. जि. नागपूर असे सांगितले. यानंतर राजेन्द्र कोराम याच्या घराच्या जवळ असलेल्या कोंबड्याचे शेडची पाहणी केली असता शेडमध्ये गव्हाचे कुटारखली देशीदारूचे खड्र्याचे 27 बॉक्स दिसले. सदर बाक्स मध्ये देशी दारूने भरलेल्या प्रत्येकी 90 एमएल च्या एकुण 2,544 निपा कि. 76,320/– रूपयांचा मुद्देमाल विना परवाना मिळून आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक श्री अमोल लगड, पो. स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 65 (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अमोल लगड 9834176423 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बोरीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. आसिफराजा. बी. शेख, पोलीस उपनिरीक्षक श्री. अमोल लगड, पोहवा. सुरेश धवराड, असलम नौरंगाबादे, पोशि. रमेश तालेवार, अमृत किंनगे, चालक पोशि खुशाल सेलोकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



## अपघातात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मानेगाव कला येथे दिनांक 19/01/2020 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान एमएच–40/वाय–6776 क्रमांकाचा टिपपरचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागुन ओव्हरटेक करून फिर्यादींचा चुलत भाऊ नामे– रमेश पतीराम उईके, वय 36 वर्ष, रा. वाघोली यांच्या एमएच–31/एसडब्लु–6449 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात रमेश उईके यांचा जागीच मृत्यू झाला. तर मागे बसलेले फिर्यादी हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 427, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पुज्जरवाड 7775092593 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर